
# दिवसभरात दोन धावत्या एसटी बस ची चाके निखळली

कधी थांबेन प्रवाशांच्या जीवाशी खेळ







**महासागर प्रतिनिधी**

**अमरावतीध/अचलपूर, ( दि.16 )–** राज्य महामार्ग परिवहन रस्ते महामंडळाच्या (एसटी) परतवाडा आगारच्या बसचे चिखलीजवळ चाकं निखळल्याची घटना ताजी असताना रविवारी( दि.16) अमरावती जिल्ह्यात एका पाठोपाठ अशा दोन धावत्या एसटी बसचे चाके निखळण्याच्या घटना समोर आल्या. मेटेंनन्सच्या नावावर रा.प.महामंडळाने 26 फेब्रुवारीपासून तिकीटांमध्ये तब्बल 15 टक्के दर वाढ केली. परंतू मेटेनन्समध्ये सुधारणा शुन्य असल्याच्या दिसत आहे. प्रवाशांच्या जीवाशी चालणारा हा खेळ कधी थांबेन अशी विचारणा एसटी लव्हर्स प्रवाशांकडून केली जात आहे. एसटी किंवा लालपरी ही महाराष्ट्राची रक्तवाहिनी असल्याचे संबोधल्या जाते. गोरगरीबांचे परिवहन म्हणून राज्य परिवहन महामंडळाची ओळख आहे. असे असताना प्रवाशांच्या सेवेसाठी असलेली ही सुव्यवस्था दुर्व्यस्था ठरत आहे.

## नागपूर महामार्गावर धावत्या शिवशाहीचे चाकं निखळले




अमरावतीहून नागपूरला जाणारी वेगवान शिवशाही एसटी बस रविवारी अचानक अपघातग्रस्त झाली. या बसचा चालक साइडचा पुढील टायर अचानक निघून दूर जाऊन पडला. या भीषण घटनेत मोठा अपघात होण्यापासून थोडक्यात बचाव झाला, आणि बसमधील 50 हून अधिक प्रवाशांचे प्राण वाचले. बसचा टायर आपोआप निघाला आणि खूप दूरपर्यंत धावत जावून दुभाजकावर जावून आदळला. चालकाच्या सतर्कतेमुळे बस उलटली नाही, तसेच सदर टायरलाही अन्य वाहन धडकले नसल्याने मोठी दुर्घटना टळली. ही घटना अमरावती-नागपूर महामार्गावर घडली. अपघातानंतर बसमधील प्रवासी भर रस्त्यात मदतीच्या प्रतिक्षेत ताटकळत उभे राहिले. उन्हाच्या तीव्र झळा सहन करत प्रवाशांना तासनतास मदतीची वाट पाहावी लागली. अशा प्रकारच्या अपघाताची ही पहिली घटना नाही.

## चालकाच्या प्रसंगावधानामुळे विद्यार्थी बचावले

रिध्दपूरजवळ बसचा टायर सुटल्यावर बसमध्ये एकच गोंधळ उडाला, मात्र चालक अतुल धाकडे यांनी प्रसंगावधान राखत बसवर नियंत्रण मिळवले. त्यांच्या सतर्कतेमुळे विद्यार्थी बचावले, पण हा प्रकार एस.टी. महामंडळाच्या हलगर्जीपणाचा गंभीर मुद्दा समोर आणतो.

## कठोर उपाययोजना आवश्यक

स्थानीय नागरिक आणि प्रवाशांनी एस.टी. महामंडळाने आपल्या बसेसची नियमित तपासणी करावी आणि हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. जर लवकरच योग्य पावले उचलली गेली नाहीत, तर भविष्यात गंभीर दुर्घटना टाळता येतील.




## सहलीला जात असलेल्या बसचे चाकं निखळले

अचलपूर येथील मुकेरीपुरा नगर परिषद उर्दू शाळा, अचलपूर येथील विद्यार्थ्यांची वरुड येथे शैक्षणिक सहल घेऊन जाणाऱ्या बस क्रमांक एमएच 40/ एक्यु 6164 चा ड्रायव्हर साइडचा टायर रिध्दपूरच्या जवळ अचानक निघून पडला. बस चालक अतुल धाकडे यांच्या सतर्कतेमुळे मोठा अपघात टळला, अन्यथा बसमधील विद्यार्थ्यांचे जीव धोक्यात आले असते. या घटनेनंतर एस.टी. महामंडळाच्या निष्काळजीपणाविरोधात नागरिकांमध्ये तीव्र रोष निर्माण झाला आहे. वारंवार बसमध्ये होणाऱ्या तांत्रिक बिघाडांमुळे प्रवाशांचे प्राण धोक्यात येत आहेत, मात्र जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई केली जात नाही.याआधीही चिखलीजवळ अशाच प्रकारे एका एस.टी. बसचा टायर निघून पडला होता, त्यानंतर दोन कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले होते. मात्र आता जनता प्रश्न विचारत आहे की परिवहन प्रमुख जीवन वानखेडे आणि शॉप इंजिनीअर चोरमले यांची कोणतीही जबाबदारी नाही का? बस सुटण्यापूर्वी तपासणी होत नाही का? असे अनेक प्रश्न निर्माण होत आहे.



# चारचाकी वाहनातून जनावरे चोरी करणारी टोळी

## पाच आरोपींना अटक | स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.16 ) –** स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी गोवंश जनावरे चोरी करणाऱ्या टोळीतील पाच आरोपींना मोर्शी परिसरातून जेरबंद केले. जुनेद खान दराब खान पठाण (22, रा. पाणीटाकी जवळ, मोर्शी), आवेज खान नविम खान (21, रा. शम्स कॉलनी, मोर्शी), अक्षय संजय काळमेंघ (21, रा. गांधी चौक, मोर्शी), तोसिफ अहेमद अब्दुल मुनाफ (24, रा. अंबाडा, ता. मोर्शी) व संतोष रामु परतेकी (19, रा. मलीनपुर, ता. मोर्शी) अशी पाच आरोपींची नावे आहेत.

17 जानेवारी रोजी सुरेश आत्माराम श्रीराव (75, रा. श्रीकृष्ण पेठ, मोर्शी) यांनी गोवंश जनावरे चोरी गेल्याची तक्रार दिली होती. या घटनेच्या अनुषंगाने मोर्शी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा नोंदवून तपास सुरु केला. दरम्यान सदर घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी जनावरे चोरीच्या घटनांना आळा घालून टोळीला पकडण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेतील पोलिसांना मार्गदर्शन करून कारवाई करण्याबाबत सूचना केल्या. या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस समांतर तपास करीत असतांना, पोलिस उपनिरीक्षक सागर हटवार व त्यांचे पथक हे रेकॉर्डवरील आरोपींचा शोध घेत मोर्शी उपविभागात पेट्रोलिंग करीत होते. दरम्यान

गोपनीय माहिती मिळाली की, जुनेद खान याने त्याचे साथीदारासह जनावरांची चोरी केली आहे. या माहितीवरून पोलिसांनी तत्काळ आरोपीतांना ताब्यात घेवून त्यांची कसून चौकशी केली असता, त्यांनी मोर्शी व शिरखेडमधून 3 गाई व 4 बैल चोरी केल्याची कबुली दिली. या माहितीवरून पोलिसांनी दोन्ही गुन्हे उघडकीस आणले. पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून गुन्ह्यात वापरलेले बोलेरो पिकअप वाहन आणि जनावरे विक्री करून कमविलेली 1 लाख 5 हजाराची रोख असा एकुण 6 लाख 5 हजाराचा मुद्देमाल जप्त केला. आरोपींना पुढील कार्यवाहीकरीता मोर्शी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## अल्पवयीन मुलीला पळविले

**अमरावती –** एका अल्पवयीन मुलीला पळविण्यात आले. ही घटना नागपुरी गेट ठाण्याच्या हद्दीत 15 फेब्रुवारी रोजी उघडकीस आली. एक 13 वर्षीय मुलगी ही आपल्या कुटुंबीयांसह 14 फेब्रुवारी रोजी रात्री घरी झोपली होती. सकाळी वडील झोपेतून उठल्यावर त्यांना ती घरी दिसून आली नाही.

# लैंगिक अत्याचारानंतर फोटो व्हायरल करण्याची धमकी

## फ्रेजरपुरा ठाण्याच्या हद्दीतील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.16 ) –** लग्नाचे आमिष दाखवून एका तरुणीवर अत्याचार करण्यात आला आणि तिला अश्लील व्हिडीओ, फोटो व्हायरल करण्याची धमकी देण्यात आली. ही घटना 15 फेब्रुवारी रोजी फ्रेजरपुरा ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली. या प्रकरणी पीडित तरुणीच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

वैभव नामदेव खोरे (27) रा. कल्याणनगर असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पीडित तरुणी ही शिक्षण घेत असून 2019 मध्ये तिचे वैभवसोबत प्रेमसंबंध होते. दरम्यान, वैभव हा तिला मारहाण करित असल्याने तिने त्याच्याविरुद्ध फ्रेजरपुरा ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्या प्रकरणात त्याला कारागृहाची वारीसुद्धा घडली. दरम्यान, वैभव हा कारागृहामधून सुटून आल्यानंतर तिच्याशी पुन्हा बोलायला लागला. मात्र, वैभव हा सुधारणार नाही, हे माहित असल्याने ती त्याच्यापासून लांबच राहत होती. परंतु, त्यानंतरही त्याने तरुणीचा विश्वास संपादन करुन तिच्याशी मैत्री केली. त्यानंतर त्यांच्यात पुन्हा संवाद सुरू झाला. दरम्यान, आपल्याला मंगळ आहे, मंगळाची पूजा माझ्या मावशीकडे मध्यप्रदेशातील खंडवा येथे आहे, अशी बतावणी वैभवने तिच्याकडे केली. त्यानुसार, 8 जानेवारी रोजी तरुणी ही वैभव व त्याच्या आईसोबत खंडवा येथे गेली. 25 जानेवारी रोजी ते अमरावतीत परत आले. त्याच दिवशी रात्री वैभवने तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्याशी बळजबरीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. या प्रकाराची वाच्यता केल्यास आपल्या मोबाइलमध्ये असलेले अश्लील व्हिडीओ व फोटो व्हायरल करण्याची धमकी वैभवने तिला दिली. त्यामुळे तिने याबाबत कुणालाही सांगितले नाही. अखेर हिंमत करून तिने घडलेला प्रकार आपल्या वडिलांकडे कथन केला. त्यानंतर तिने वडिलांसह फ्रेजरपुरा ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

# गाडगेनगर हद्दीतील दोन घरफोडीचे गुन्हे उघड

## आरोपीला अटक, गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 ची कामगिरी



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.16 )–** गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 च्या पथकाने गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील घरफोडीच्या गुन्ह्यात एका आरोपीला अटक केली असून, दोन गुन्हे उघडकीस आणले आहे. अभिषेक आनंदीलाल साहू (वय 22 वर्ष रा. संतोषी नगर, साहूबाग जवळ, अमरावती) असे आरोपीचे नाव आहे. 14 फेब्रुवारी रोजी सायंकाळनंतर ही कारवाई करण्यात आली. आरोपीला पुढील तपासकरिता गाडगेनगर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

14 फेब्रुवारी रोजी गजानन जनार्धन मस्के (रा.चांगापूर) व ऋषिकेश धनराज शर्मा (वय 30, रा. चांगापूर) यांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुध्द घरफोडीच्या कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता. या गुन्ह्याचा संमातर तपास गुन्हे शाखा युनिट क्रंमांक 1 करित होते. दरम्यान युनिट 1 च्या पोलिसांनी घटनास्थळाजवळील सिसीटीव्ही फुटेजची पाहणी केली आणि गुप्त माहितीवरून रेकॉर्डवरील गुन्हेगार अभिषेक आनंदीलाल साहू हा आरोपी असल्याचे निष्पन्न केले. त्यानंतर पोलिसांनी आरोपी अभिषेक साहू याला त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याची चौकशी केली असता, त्याने दोन्ही गुन्हे त्याचा मित्र विशाल कराळे (रा. झाडपीपूरा, रतनगंज, अमरावती) याच्यासोबत मोपेड गाडीने केल्याचे सांगितले आहे. याप्रकरणात पोलिसांनी अभिषेकला अटक केली असून, त्याचा साथीदार विशाल कराळे पसार झाला आहे. त्याचा शोध पोलिस घेत आहे. अटक आरोपीला पुढील कारवाईसाठी गाडगेनगर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. सदरची कारवाई पोलीस आयुक्त नवीनचन्द्र रेड्डी, पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर, सागर पाटील, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे, अरुण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट क्रं. 1 चे वरिष्ठ पोलीस निरिक्षक गोरखनाथ जाधव, सहायक पोलिस निरीक्षक मनीष वाकोडे, पोलिस उपनिरीक्षक प्रकाश झोपाटे, पोलिस हवालदार सतीष देशमुख, फिरोज खान, सचीन बहाळे, नाईक पोलीस अमंलदार नाझीमउददीन सैयद, विकास गुडदे, सचिन भोयर, सुरज चव्हाण, निखील गेडाम, चालक रोशन माहुरे, किशोर खेंगरे यानी केली आहे.

# कारची दुचाकीला धडक, एकाचा मृत्यू, दोन जखमी

## मोर्शीमध्ये अपघाताची मालीका सुरूच

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.16 ) –** भरधाव कारने दुचाकीला धडक दिल्याने एकाचा मृत्यू झाला, तर दोन जखमी झाले. ही घटना 15 फेब्रुवारी रोजी सायंकाळी शहरातील महाराष्ट्र कॉलनी जवळ घडली. प्रवीण नामदेव मोरे (30, रा. पाण्याची टाकी, मोर्शी) असे मृताचे नाव आहे. तर या अपघातात राजेंद्र अजाबराव शेंडे (30, रा. रेणुका नगर) व अनिल हमु उईके (32 वर्ष रा. गधेघाटपुरा, मोर्शी) जखमी झाले आहेत. राजेंद्र शेंडे, प्रवीण मोरे व अनिल उईके हे मजूरीचे काम करीत असून ते आपले काम आटोपून मोर्शी येथे आपल्या घरी परत येत होते. दरम्यान मोर्शी येथून अमरावतीकडे जाणाऱ्या महाराष्ट्र कॉलनी येथील पेट्रोल पंपाजवळ कार क्र.एम एस 27 बी व्ही 9901 ने त्यांच्या दुचाकीला धडक झाली. या भीषण अपघातात दुचाकीवरील तिघेही रस्त्यावर पडले आणि गंभीररित्या जखमी झाले. या घटनेनंतर काही नागरिकांनी जखमींना मोर्शी उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्रथमोपचार केल्यानंतर त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्याचा सल्ला दिला. दरम्यान प्रवीण मोरे यांच्यावर उपचार सुरु असतानाच मृत्यू झाला. या घटनेच्या माहितीवरून मोर्शी पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला.

# कलिंगड, खरबुज चे क्षेत्र वाढले

## उन्हाळ्यात बाजारात टरबुजाची मागणी ● आधुनिक शेतीमध्ये मल्चींगपेपरचा वापर





**नितीन दुर्बुडे**

**पथ्रोट, ( दि.16 )–** कलिंगड आणी खरबुज ही लहाणापासुन मोठ्यांपर्यंत सर्वांचे आवडते फळ असल्याने कडक ऊन्हाळ्यात थंडगार गोड आणि स्वादिष्ट गर कलिंगडापासुन मिळतो. कमी गुंतवणुकीत ज्यास्त उत्पादन व टिकाऊपणा या गुण वैशिष्ट्यामुळे कलिंगड लागवड दिवसेंदिवस वाढत आहे. पुर्वी नदीपात्रात किंवा नदीकाठीच लागवड होत असलेली वेलवर्गीय फळ कलिंगड, खरबुज, काकडी सिंचनाच्या मुबलक सोई झाल्याने शेतशिवारात उत्पादित होत आहे. काळाच्या ओघात कमी काळात अधिकचे उत्पन्न घेण्यासाठी टरबूजाचे क्षेत्र वाढत आहे. काही शेतकर्यानी रमझान महीणा हेरुन टरबुज लागवडी केल्याने पुढच्या काळात अपेक्षीत दर ही मिळणार आहे. सध्या काढणीस आलेल्या टरबुज फळाना 7 रुपये ते 9 रुपये किलोचा दर मिळत आहे. मात्र, बदलत्या वातावरणामुळे शेतकऱ्यांसमोरील आव्हानेही वाढत आहेत.

शेतकरी नगदी पीक म्हणून टरबुजाची लागवड करतात. उन्हाळी हंगामात बाजारात टरबुजाची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. तसेच या फळामध्ये अनेक पोषक तत्वे आढळतात. हळूहळू उन्हाचा चटका वाढत असल्याचं चित्र दिसत आहे. उन्हाळ्यात थंड पेयांनी जशी मागणी असते, तशीच टरबूज आणि खरबुजाला देखील मोठी मागणी असते. उन्हाळ्याच्या काळात शेतकरी टरबुजाची लागवड करुन चांगला नफा मिळवतात. कारण उन्हाळ्याच्या काळात टरबुजाला मोठी मागणी असते. तसेच टरबुज आरोग्याच्या दृष्टीनं एक महत्वाचं फळ आहे.

### आधुनिक शेतीवर जोर

पारंपारिक शेती केल्याने उत्पन्न कमी खर्च व कष्ट ज्यास्त होत असल्याने शेतकरी सध्या आधुनिक शेतीमध्ये मल्चींगपेपरचा वापर करुन पिकाना जिवनदान देत आहे. भाजीपाल्यासह ईतर पिकांची लागवड मल्चींग पेपर चा वापर करुन पिकात होणार्या तणापासुन मुक्ती मिळवतात. मधमाश्यांचे प्रमाण घटल्याने टरबुज वेलीना फळं कमी लागत असल्याचे कृषी तज्ञ सांगतात. मधमाशांचे प्रमाण घटल्याने टरबुज वेलाना फळधारणा होत नसल्याचे उत्पादन घटण्याची शक्यता असल्याचे शेतकरी सांगतात.

# सलग दुसऱ्या दिवशीही कृषि प्रदर्शनीला शेतकरी, नागरीकांचा प्रतिसाद



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती ( दि.16 )–** अमरावती येथील सांयन्सकोर मैदान येथे सुरु असलेल्या जिल्हास्तरीय कृषि विकास परिषद व प्रदर्शनीला सलग दुसऱ्या दिवशी शेतकरी व नागरीकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पहायला मिळत आहे.

दुसऱ्या दिवसाची सुरुवात प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया योजना,आरोग्याच्या दृष्टीने पोष्टिक तृणधान्याचे महत्व, संरक्षीत शेती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) कृषि क्षेत्रात वापर व उपयोग,पोष्टिक तृणधान्याचे महत्व व लागवड पद्धती, आरोग्य दायी जिवन शैली या विविध विषयावर परीसंवादाने झाली.

सांयकाळी सांस्कृतिक कार्यक्रमात मिर्झा एक्स्प्रेस या कार्यक्रमाला अमरावती करांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. या प्रदर्शनीला सलग दुसऱ्या दिवशी विविध स्टॉलला 5200 शेतकऱ्यांनी व नागरीकानी भेट देऊन विविध तंत्रज्ञानाची माहिती घेतली तसेच खरेदी केली. प्रदर्शनीचे ठिकाणी उभारण्यात आलेल्या 288 स्टॉलचे माध्यमातून 15 लाखांची उलाढाल झाली असे कृषि विभागाकडून सांगण्यात आले. यामध्ये विविध धान्ये, मसाले, भाजीपाला, गृहोपयोगी वस्तू, शोभीवंत फुलांची झाडे, कृषि निविष्ठा,सिंचन साधने, मशिनरी,औजारे असे विविध स्टॉल आहेत,त्यात धनलक्ष्मी महीला बचत गट व महात्मा ज्योतिबा फुले महिला बचत गट या दोन स्टॉलवर रोडगे, झुणका भाकर या पदार्थांची चव चाखण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून आली. नैसर्गिक शेती हि काळाची गरज आहे हे ओळखून पी.आर.पोटे पाटील कृषि महाविद्यालय,अमरावतीचे विद्यार्थ्यांनी नैसर्गिक शेतीबद्दल पथनाट्यचे माध्यमातून सादरीकरण करून जनजागृती केली. विशेष म्हणजे या कृषि प्रदर्शनीला मेळघाटचे आमदार केवलराम काळे,अमरावती मतदार संघाच्या आमदार सुलभाताई खोडके यांनी आवर्जून उपस्थित राहून विविध स्टॉलला भेट दिली. या प्रदर्शनीमुळे खर्या अर्थाने शेतकरी ते ग्राहक संकल्पना प्रत्यक्षात साकार होताना दिसत आहे.


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# कांडली ग्रामपंचायतमध्ये नाली बांधकामात भ्रष्टाचार

## बंदिस्त ऐवजी खुल्या नालीची निर्मिती | ग्रामस्थांची वरिष्ठांकडे तक्रार

**महासागर प्रतिनिधी**
**परतवाडा, ( दि.16 )**– अचलपूर पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या कांडली ग्रामपंचायत मध्ये नालीच्या बांधकामात मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याची बाब समोर आली असून या कामात भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. या संदर्भात ग्रामस्थांनी वरिष्ठांकडे तक्रार दाखल केली आहे. मंजूर आराखड्यानुसार बंदिस्त नालीचे बांधकाम अपेक्षित असताना प्रत्यक्षात खुल्या नालीची निर्मिती करण्यात आली आहे. त्यामुळे या कामात मोठ्या प्रमाणात अपहार झाल्याचे स्पष्ट होत असून नागरिकांमध्ये रोष व्यक्त करण्यात येत आहे. ग्रामपंचायतीने या नालीच्या बांधकामावर लक्षावधी रुपये खर्च केले आहे. पण त्या तुलनेत बांधकामाचा दर्जा राखला गेला नसून बांधकामाच्या स्वरूपाबाबतही अनेक शंका उपस्थित केल्या जात आहे. बंदिस्त नालीमुळे परिसरात स्वच्छता राखण्यास मदत होऊन नागरिकांची अनेक बाबतीत सुटका झाली असती, असे रहिवाशांचे म्हणणे आहे. मात्र नालीचे खुल्या स्वरूपात बांधकाम करण्यात आल्याने आता नालीत कचरा अडकणे, दुर्गंधी पसरणे आणि डासांच्या उत्पत्तीतून रोगराई वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



कांडली ग्रामपंचायतमधील वार्ड क्रमांक 5 मध्ये लोखंडे यांच्या घरापासून तर गाडेराव यांच्या घरापर्यंत हे नालीचे बांधकाम 15 व्या वित्त आयोगाच्या निधीतून मंजूर झाले होते. या नालीप्रमाणेच गावातील इतरही अनेक रस्ते व नालीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे आहे, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. ग्रामपंचायत इकडून ऑनलाइन बी 1 चे काम रद्द करण्यात आले आणि स्वमर्जीतील ठेकेदारांना कामे देण्यात आल्याचा आरोपही केला जात आहे. ग्रामपंचायतच्या काही पदाधिकाऱ्यांचा या गैरप्रकारात सहभाग असल्याचे बोलले जाते. सरळ दगड, विटा टाकून नालीचे बांधकाम करण्यात येत असल्याने ते निम्न दर्जाचे होत आहे. मंजूर आराखड्यानुसार काम होत नसल्याने हा स्पष्टपणे गैरव्यवहार असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून या प्रकाराची चौकशी व दोषींवर कारवाई करण्याची मागणी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

# शासकीय कामात अडथळा करुन रेतीचा ट्रक पळविला

## तीन वाहनाच्या चालकांविरुध्द गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 16 )** – शासकीय कामात अडथळा करून रेती तस्करांनी महसूल अधिकार्यासमोरच रेतीचा ट्रक पळवून नेल्याची घटना 14 फेब्रुवारी रोजी नांदगाव पेठ हद्दीतील नायरा पेट्रोल पंपाजवळ उघडकीस आली. रहाटगाव येथील मंडळ अधिकारी गजानन रामदास दिवसे (54, रा. शांतीनगर, यशोदानगर) यांच्या तक्रारीवरून नांदगाव पेठ पोलिसांनी दोन ट्रक व एका कारच्या चालकाविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

रहाटगाव येथील मंडळ अधिकारी गजानन दिवसे हे आपल्या सहकार्यांसह गौणखनिज वाहतुकीवर लक्ष ठेवत पेट्रोलिंग करीत होते. दरम्यान महसूल



पथकाने नांदगाव पेठ टोल नाक्याजवळील नायरा पेट्रोल पंपाजवळून एम 34 बिझेड 3635 या क्रमांकाचा ट्रक जाताना दिसला. महसुल अधिकार्यांनी ट्रकचा पाठलाग करून ट्रकला पकडले आणि चालकाला रॉयल्टीबाबत विचारणा केली. त्यावेळी त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यानंतर ट्रक चालकाने फोन करून ट्रक मालक मुद्दतसर हुसैन अलताफला बोलावून घेतले. त्यानंतर ट्रक मालकासह दोन जण हे कारने तेथे पोहोचले. त्यानंतर ट्रक चालकाने जबरदस्तीने ट्रक सुरु करून पलायन केले. या घटनेची तक्रार गजानन दिवसेंनी नांदगाव पेठ पोलिसात दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी ट्रक क्रमांक एमएच 34 बिझेड 3635 चा चालक व मालक मुद्दतसर हुसैन अलताफ, आय टेन कारमधील इसम तसेच स्विफ्ट कारचा चालक अशा आरोपींविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

## पाचबंगला परिसरातील दारु अड्डयावर धाड

**अमरावती** – बडनेरा पोलिसांनी जुनीवस्तीतील पाच बंगला परिसरात धाड टाकून दारुची अवैध विक्री करणार्या दोघांविरुध्द गुन्हा नोंदविला. 14 फेब्रुवारी रोजी ही कारवाई करण्यात आली. एएसआय प्रमोद गुडधे यांच्या तक्रारीवरून बडनेरा पोलिसांनी आरोपी करण नितीन खुरद (20, रा. हिरा कॉलनी, गोपालनगर) व वेदांत विनोद वर्गे (19, रा. आदर्शनगर) यांच्याविरुध्द गुन्हा नोंदविला.

# मोर्शीत उत्साहात साजरा होतोय प्रगट दिन उत्सव

## माया बारस्करांच्या भागवत कथेच्या आयोजन

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.16 )** – श्री गजानन महाराज प्रगट दिन उत्सव समिती आणि श्री महादेव मंदिर संस्थांनच्या वतीने श्री संत गजानन महाराज प्रगट दिन महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. त्यानिमित्त 13 ते 19 फेब्रुवारी



या कालावधीत हभप मायाताई बायस्कर यांच्या सुमधुर वाणीतून दररोज संगीतमय श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे.

13 फेब्रुवारीला कलश स्थापना करून या महोत्सवाला प्रारंभ झाला. दररोज हरिपाठ व आरती केली जात आहे. तसेच गायत्री महिला भजन मंडळ, ओम शिव दुर्गा महिला भजन मंडळ, शिवशक्ती महिला भजन मंडळ, नवयुग महिला भजन मंडळ, शिवकृपा महिला भजन मंडळ, ज्ञानेश्वर माऊली महिला भजन मंडळ, समर्थ रामजी बाबा भजन मंडळ, मोरया महिला भजन मंडळ, महा कल्याणी महिला भजन मंडळ, श्री गजानन महाराज महिला भजन मंडळ यांच्या भजनांचा कार्यक्रम होत आहे. 20 फेब्रुवारी रोजी शहरातून श्रींच्या पालखीची भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. मायाताई बायस्कर यांच्या गोपालकाल्याच्या कीर्तनानंतर भव्य महाप्रसादाचे वितरण होणार आहे. या प्रगट दिन महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी श्री गजानन महाराज प्रगट दिन उत्सव समितीचे कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

## वीज चोरावर गुन्हा दाखल

**अमरावती** – तारखेडा परिसरातील मदिना गेट स्थित एका घरावर महावितरणाच्या पथकाने धाड टाकून वीज चोरीचा प्रकार उघडकीस आणला. या घटनेची तक्रार भाजी बाजार महावितरण केंद्राचे सहायक अभियंता निलेश अरुण गुल्हाने (38) यांनी 14 फेब्रुवारी रोजी राजापेठ पोलिस ठाण्यात दिली.

# खो-खो (पुरुष) स्पर्धेकरीता विद्यापीठाचा संघ घोषित

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 16 )** विक्रांत युनिर्व्हसिटी ग्वालियर येथे 7 ते 11 मार्च दरम्यान होणा–या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ खो–खो (पुरुष) स्पर्धेकरीता विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला असून चमूचा प्रशिक्षण वर्ग श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती येथे दि. 23 फेब्रुवारी ते 4 मार्च दरम्यान होणार आहे.



चमूमध्ये कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय चिखलदराचा रोशन पिवाल, कौशिक गहलोत, पवन गुप्ता व आदित्य राऊत, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय अमरावतीचा यश सदांशिव, प्रतिक पाल, भूषण गेडाम व श्रृतिज अवसरे, बी.बी. शिवशक्ती महाविद्यालय बाभुळगांवचा शुभम सुरोशे, स्व.एन.ए.डी. महाविद्यालय चांदुरबाजारचा मयुर खंडारे, इंदिरा गांधी महाविद्यालय राळेगांवचा करण आमटे, महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय अमरावतीचा हरिश उके, कला व वाणिज्य महाविद्यालय वरवट बकालचा आयुष बोरखडे, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावतीचा लख्खुराम वड्डे, आर.जी. राठोड कला महाविद्यालय मूर्तिजापूरचा हर्षल इंगळे, युवाशक्ती कला व विज्ञान महाविद्यालय अमरावतीचा शरद पाटील, कला महाविद्यालय बुलडाणाचा एजाज हिरीवाले व स्व. दत्तात्रय पुसदकर महाविद्यालय नांदगांव पेठचा चेतन उके यांचा समावेश आहे. निवड झालेल्या सर्व खेळाडूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे.

# वीर वामनराव जोशी शाळेत गॅस विरहित पदार्थ बनविणे कार्यशाळा

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 16 )** वीर वामनराव जोशी प्राथमिक शाळेत उपक्रमशील शिक्षिका आसावरी सोवळे व शिक्षक सुजित खोजरे यांनी शाळेत गॅस विरहित पदार्थ बनविण्याच्या कार्यशाळेचे आयोजन (दि.13) केले. यात इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनात अगदी लहानांपासून तर मोठ्यांपर्यंत सर्वांना आवडणारी भेळ तयार करून सर्व वर्गाच्या विद्यार्थ्यांनी बनवलेल्या भेळ पार्टीचा मनमुराद आनंद घेतला.

यावेळी शाळेच्या शिक्षिका सोवळे यांनी विद्यार्थ्यांना गॅसविरहित पदार्थ, जे अगदी लहान मुलांनाही सहज बनविता येतात. त्यांचे आपले आरोग्यासाठी असलेले महत्त्व व फायदे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

पालेभाज्या धुणे, चिरणे, भेळमध्ये सर्व मसाले मिसळणे इत्यादी सर्व कामे शिक्षकांच्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांनी करून शानदार भेळ तयार केली व सर्व विद्यार्थ्यांना कागदी प्लेटमध्ये वाटपही विद्यार्थ्यांनीच केला. कार्यशाळे दरम्यान उपस्थित असणाऱ्या काही पालकांनीही



विद्यार्थ्यांना कंपनी दिली. इशिका लोंकलकर,श्रेया पांडे, रागिणी काठोळे,अनमोल नागरिकार,अंकुश यादव, अमित श्रीवास,रुद्र सारवान, दृष्टी सारवान,गार्गी रत्नपारखी,कार्तिक वानखडे, तनिष्क सरोदे, दिव्यांश गजबे,विराज गायकवाड, आरव राऊत, कनक झांझोटे, वंशिका दोनाडकर, माही बगेकर, मानसी पांडेय, आश्रय राणे, कृष्णा काळे, भावीन माहुरे, योगेश इंगोले, नबील पटेल या सर्व विद्यार्थ्यांनी भेळ बनविण्याच्या या कार्यशाळेसाठी परिश्रम घेतले.

उपस्थित सर्व पालकांनी शाळेच्या या विद्यार्थ्यांकरिता आयोजित केलेल्या आनंददायी उपक्रमाचे मन:पूर्वक कौतुक करून सर्वांचे अभिनंदन केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक दिलीप सदार, मोनिका पाटील, ज्योती मडावी, सुजित खोजरे, आसावरी सोवळे, सचिन वंदे, मनीषा श्रीराव, अश्विनी सावरकर, पल्लवी बिजवे, विलास देठे, अमोल पाचपोर, चित्रा विघे, सीमा काळे, ईश्वर हेमने इत्यादी कर्मचाऱ्यांसह विद्यार्थी व पालकांची भरगच्च उपस्थिती होती.



# मजूर कामगार सहकारी संस्था संघ अध्यक्षपदी शेंडे तर उपाध्यक्षपदी माकोडे

**महासागर प्रतिनिधी**
**धामणगाव रेल्वे, ( दि. 16 )** – अमरावती जिल्हा मजूर कामगार सहकारी संस्था संघ निवडणूकित अध्यक्षपदी माधव शेंडे तर उपाध्यक्षपदी साहेबराव माकोडे यांची अविरोध निवड (दि.13) झाली आहे.

जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्थाच्या सर्वांगीण विकास व उभारी देण्यासाठी दि जिल्हा मजूर कामगार संघाचा नेहमी पुढाकार असतो. या संघाची निवडणूक निरीक्षक राजेश यादव व माजी अध्यक्ष तनवीर सादिक का ?ी यांच्या नेतृत्वात पार पडली. यात अविरोध अध्यक्षपदी माधव शेंडे,तर उपाध्यक्षपदी साहेबराव माकोडे यांची निवड झाली. यावेळी संचालक नंदकिशोर मोहोड, गुलाम राजीक खान सादुल्ला खान, अझर खा हबीब खा, स्वप्नील भुयार, राजकन्या काळे, तरन्नुमनीसा मोहम्मद नईम शेख, हिरुजी हेकडे, अशोक दूधंडे तज्ञ संचालक राजू मुंधडा उपस्थित होते.निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून राजेश यादव व राहुल पुरी उपस्थित होते.

# अमरावतीत बेकायदेशीर होर्डिंगचा सुळसुळाट!

## प्रशासनाचे दुर्लक्ष ?

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 16 )** – शहरात ठिकठिकाणी अनधिकृत होल्डिंग–बॅनर झळकत असतानाही महापालिका प्रशासनाकडून मात्र, दुर्लक्ष केले जात आहे. राजकमल चौकातील ही परिस्थिती पाहून राजकीय पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये चर्चा सुरु झाली आहे.

राजकमल चौकातील उड्डाणपुलाखाली आणि रस्त्याच्या दोन्ही बाजूला मोठ्या प्रमाणात बॅनरांची गर्दी झाली. यामध्ये काही होर्डिंग व बॅनर हे अवैधरित्या विनापरवानगी लावण्यात आल्याचे दिसून येत आहे. परंतु तरीसुध्दा महापालिका प्रशासनाकडून कुठल्याही कारवाईची भूमिका घेतल्या जात नाही. त्यामुळे मनपाचे लाखो रुपयांचे नुकसान होत आहे. झोन विभागाकडून कारवाईची उदासीनता दिसून येत आहे. त्यामुळे सोशल मिडियावरील विविध व्हॉटसॲप समुहातील राजकीय पदाधिकारी व नागरिकांमध्ये चर्चा सुरु झाली आहे. अवैध होर्डिंग व बॅनरवर कारवाई मागणी आता जोर धरू लागली आहे.

# शिक्षणाच्या गंगोत्रीचा महासागर व्हावा : प्रा. वसंत पुरके

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 16 )** – शिक्षण हे मानवी जीवनाला उज्ज्वल करणारी एक निरंतर प्रक्रिया आहे. शिक्षण तळागाळापर्यंत पोहचविणे हे प्रत्येक घटकाचे कतर्व्य आहे. शिक्षण व्यवस्थेच्या शासन, संस्था, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी या घटकांपैकी एक जरी घटक निसरडा झाला. तर संपूर्ण व्यवस्थाच कोलमडून पडल्याशिवाय राहत नाही आणि त्यात मानवी जीवनाची हानी होणे अपरीहार्य असते. म्हणून प्रारंभी छोटा प्रवाह असला तरी या शिक्षणाच्या गंगोत्रीचा सात्विक महासागर होणे वर्तमान काळात महत्वाचे आहे. असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी शालेय शिक्षण मंत्री प्रा. वसंत पुरके यांनी केले.



### संभाव्य धोके कसे असतील यावर उपाय शोधावे लागतील

माजी विधान परिषद सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी आपल्या शुभेच्छापर भाषणातून वर्तमान शिक्षण व्यवस्था आणि शासन यातील संभाव्य धोके कसे असतील, त्यावर काय उपाय शोधावे लागतील याची जाणीव करुन दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. सतीश कुळकर्णी यांनी शिक्षणातील गुणवत्ता, विद्यार्थी आणि शिक्षकांची कमी यावर विवेचन करुन प्रा. वसंत पुरके यांच्या व्याख्यानातील काही बाबींचाचा अभ्यासात्मक आढावा घेतला.

येथील भारतीय महाविद्यालयात भारतीय विद्या मंदिर संस्थेचे संस्थापक अण्णासाहेब वैद्य यांच्या स्मृतीप्रित्यर्थ गुणवत्तापूर्ण शिक्षण: वास्तव आणि अपेक्षा या विषयावर ते बोलत होते. प्रारंभ, मध्य आणि वर्तमान अशा शिक्षणाच्या टप्प्यांना अधोरेखित करतांना संत ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, कबीर यांच्या अभंग ओवीचे दाखले देत तसेच ग्रेस, मर्देकर आणि सुरेश भट यांच्या कवितेतील शैक्षणिक व सामाजिक वास्तव मांडत आजच्या शिक्षणाच्या संदर्भात पुरके पुढे म्हणाले की, संस्था, शिक्षण परीसर आणि शिक्षक हे घटक माणसाच्या जीवनाला आकार देणारे असले पाहिजे. काळ बदलला, काळाचे संदर्भ बदलले नवीन शैक्षणिक धोरण आले आणि विद्यापीठस्थरावर ते लागुही झाले, परंतु त्याची परिणामकारता किती दिसून येते. हा संशोधनाचा विषय राहिला आहे. शिक्षणाच्या अपरिहार्यतेच्या संदर्भात त्यांनी आपल्या शालेय शिक्षण मंत्रीपदाच्या काळातील काही आठवणीही उपस्थितांना सांगितल्या. सभागृहात प्रा. बी.टी. देशमुख यांची आदरयुक्त भीती आणि संबंधित मंत्र्यांची अगतिकता यावरही त्यांनी विनोदीशैलीत वक्तव्य केले. हे करीत असतांना ए.पी.जे. अब्दुल कलामांच्या सुमाषितांना मात्र ते विसरले नाहीत. प्रारंभी संत गाडगे बाबा व अण्णासाहेब वैद्य यांच्या फोटोचे पूजन व दीपप्रज्वलन पाहुण्यांच्या हस्ते झाले. स्वागतानंतर महाविद्यालयांच्या प्राचार्य डॉ. आराधना वैद्य यांनी आपल्या प्रास्ताविकातून अण्णासाहेब वैद्य यांच्या आठवर्णीना ऊजाळा दिला. कार्यक्रमानिमित व्यासपीठावर संस्थेचे सरचिटणिस सोमवंशी, प्रा. बिजवे, प्रा. पंकज वैद्य उपस्थित होते. संचालन व आभार डॉ. मिता कांबळे यांनी मानले. कार्यक्रमाला संस्थेच्या सर्व पदाधिकारी, शहरातील गणमान्य व्यक्ती, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने गर्दी झाली होती त्यामध्ये शहरातील मान्यवर व्यक्ती पत्रकार बंधू भगिनी जेष्ठ व्यक्ती उपस्थित होते.

# जिल्ह्यात 22 हजार 234 बचत गटातून लाखो महिला एकत्रित

## जिल्ह्यातील ग्रामीण भागात 78 हजारांवर लखपती दीदी | जिल्हा परिषदेच्या उमेद अभियानाची यशस्वी वाटचाल



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 16 )** – जिल्ह्यात 14 तालुक्यांमध्ये आतापर्यंत 22 हजार 234 बचत गटांमध्ये 2 लाख 13 हजार 822 इतक्या महिला सदस्य कार्यरत आहेत. या बचत गटांच्या माध्यमातून लाखो महिलांना एकत्र आणण्याचे काम जिल्हा परिषदेच्या उमेद अभियानाने यशस्वीपणे केले आहे. त्यातच जिल्ह्यातील ग्रामिण भागात 78 हजार महिलांनी लखपती दिदी योजनेचा लाभ घेतला आहे.

महिलांची आर्थिक, सामाजिक प्रगती व्हावी, यासाठी शासनाने महिलांकरिता विविध योजना सुरु केल्या आहेत. यामध्ये %लखपती दीदी% ही योजना राबवली जात आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील 22 हजार 234 महिला बचत गटांच्या माध्यमातून उमेद अभियानांतर्गत यंदा 83 हजार 272 एवढे उद्दिष्ट शासनाकडून देण्यात आले होते. त्यापैकी आतापर्यंत 78 हजार 711 महिला लखपती झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. बचत गटांसोबत काम करणाऱ्या महिलांना लखपती दीदी योजनेचा लाभ घेता येणार आहे. उमेद अभियानांतर्गत महिला बचत गटांना व्यवसायांकरिता विविध बँकांच्या माध्यमातून आतापर्यंत 22234 महिला बचत गटांना 322 कोटी 26 लाख 21 हजार रुपयांचे कर्जवाटप केले आहे.

> बचत गटाला मिळालेल्या कर्जातून गटातील सर्व महिलांनी मिळून रोजगार सुरू केला आहे. कुटुंबालाही मदत झाली.
>
> **प्रभा मानकर, महिला बचत सदस्या**

### रोजगारातून महिलांचे सक्षमीकरण

उमेद अभियानाच्या माध्यमातून या महिला मसाले, पापड, लोणचे यांसह अनेक खाद्यपदार्थाची निर्मिती करत आहेत. यामुळे रोजगार मिळाला आहे. रोजगार अन् स्वयंरोजगारांना नवी मोर्शी वाट शोधून उत्तुंग भरारी घेण्यासाठी महिलासुद्धा आता सर्वच क्षेत्रांत अग्रेसर आहे. उमेद अभियान प्रेरक बनले आहे.

**प्रीती देशमुख, प्रकल्प संचालक**

> बचत गटामुळे बचतीची सवय पडली. उमेद अभियानाव्दारे बँकेमार्फत कर्जही मिळाले. यामुळे ग्रामीण भागात महिला बचत गटांना व्यवसायामुळे रोजगार मिळाला.
>
> **विमल मेश्राम, महिला बचत सदस्या**

# ऑटोत गॅस रिफिलिंगचा गोरखधंदा उघडकीस

## 2 लाख 67 हजाराचा मुद्देमाल जप्त

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.16 )** - गुन्हे शाखा युनिट क्रं. 1 च्या पथकाने ईमाननगरात सुरु असलेल्या अवैधरित्या ऑटोमध्ये गॅस रिफीलिंगचा 15 फेब्रुवारी रोजी रात्री पर्दाफाश केला. शहजाद परवेज अब्दूल झहीर (37 वर्षे रा. इमाम नगर, नागपूरी गेट) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्या ताब्यातून 23 गॅस सिलिंडर, रिफिलिंगचे साहित्य, दोन ऑटो व वजन काटा असा एकुण 2 लाख 67 हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीला पुढील कारवाईसाठी नागपूरी गेट पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.



15 फेब्रुवारी रोजी गुन्हे शाखेच्या पोलिसांना गुप्त माहिती प्राप्त झाली होती की, लालखडी परिसरातील ईमाम नगरात घरगुती वापराचा एल.पी.जी. गॅस सिलेंडरमधून अवैधरित्या ऑटोमध्ये रिफीलिंग होत आहे. या खात्रीशीर माहितीवरुन गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 चे अधिकारी व अंमलदार यांनी ईमाम नगरातील घटनास्थळी धाड टाकली. त्यावेळी तेथील टीनाच्या शेडमध्ये एक ईसम हा अर्धा हार्स पावरच्या गॅस रिफीलिंग मशीनने एका प्लॉस्टीक पाईपच्या सहाय्याने ऑटोमध्ये गॅस भरत असतांना मिळून आला. त्यावेळी सदर ठिकाणी दोन ऑटो हे गॅस भरण्यासाठी आलेले होते. आरोपी हा घरगुती वापराचे सिंलेडरमधुन ऑटोमध्ये रिफीलिंग करीत असल्याचे आढळून आल्याने पोलिसांनी आरोपी शहजाद परवेज अब्दूल झहीर याला ताब्यात घेतले.

### दोन ऑटोसहीत 23 सिलिंडर जप्त

याप्रकरणात आरोपीविरुध्द नागपूरी गेट ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळावरुन 55 हजार रुपये किमंतीचे 22 नग भारत कंपनीचे घरगूती भरलेले सिलेंडर, 2 हजार रुपये किमंतीचे एक नग भारत कंपनीचे घरगुती खाली सिलेंडर, 5 हजार रुपये किमंतीचे एक पिवळ्या रंगाची हाफ हाउस पॉवरची गॅस भरण्यासाठी वापरत असलेली मशीन, 5 हजार रुपये किमंतीचा एक इलेक्ट्रीक वजन काटा, 2 लाख रुपये किंमतीचे एम.एच 27 बि.डब्लू 5355 व एम.एच 27 पि 8218 या क्रमांकाचे ऑटो असा एकुण 2 साथ 67 हजार रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त केला.

# प्रशासनाला कधी येईल जाग!

## राज्य महामार्गावर लिकेजमुळे वाहनधारकांना त्रास

### दोन-तीन वर्षापासून पाण्याचा अपव्यय

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.16 )** - मोर्शी ते आष्टी रोडवर मोर्शी पासून जवळ तीन किलोमीटर अंतरावर झिरो पॉईंट जवळ पाणीपुरवठा योजनेच्या पाईपलाईन च्या लिकेज मधून गेल्या दोन-तीन वर्षापासून दररोज लाखो लीटर पाणी वाया जात आहे. प्रशासनाला कधी जाग येईल, असा प्रश्न वाहनधारकांकडून विचारला जात आहे. यापुर्वीही 'महासागर' ने ही समस्या प्रकाशात आणली होती.






मोर्शी ते आष्टी या राज्य महामार्गावरून वाहत असणाऱ्या या पाण्यामुळे वाहनधारकांना खूप त्रास सहन करावा लागत आहे. पाणी पुरवठा योजनेच्या अधिकाऱ्यांना तसेच या मार्गाची देखभाल करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना सुद्धा याबाबतची जाणीव असून देखील या गंभीर बाबीकडे लक्ष देण्यास कुणीही तयार नाहीत. याच मार्गावर खुले कारागृह आहे. राज्य महामार्ग असल्याने या मार्गावरून मोर्शी ते वर्धा एसटी गाड्या धावतात तसेच नलदमयंती सागर असल्यामुळे पर्यटकांचीही या रस्त्याने खूप वर्दळ असते.

या लिकेच्या अव्याहतपणे रस्त्यावरून वाहणाऱ्या पाण्यामुळे सर्व वाहनधारकांना त्रास होतो तरी याकडे कुणाचे लक्ष नाही. त्यामुळे सर्वत्र आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे.

# स्काऊट-गाईड मेळाव्यात न्यू इंग्लिश स्कूलची उत्कृष्ट कामगिरी

## विविध स्पर्धांमध्ये प्राप्त केले पुरस्कार

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड,( दि.16 )** - स्काऊट गाईडचा 41 वा अमरावती जिल्हास्तरीय मेळावा भातकुली येथे नुकताच पार पडला. त्यात वरुड च्या न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत आपली छाप सोडली. विविध स्पर्धांमध्ये शाळेच्या विद्यार्थ्यांनी पुरस्कार प्राप्त केलेत.



श्री शिवाजी शिक्षण संस्थेद्वारा संचालित न्यू इंग्लिश हायर सेकंडरी शाळेच्या स्काऊट-गाईड पथकाने जिल्हास्तरीय मेळाव्यात सहभाग घेतला होता. शाळेच्या पथकाला तंबू सजावट स्पर्धेत प्रथम क्रमांक, शोभायात्रेत प्रथम क्रमांक, बिन भांड्याचा स्वयंपाक या प्रकारात द्वितीय क्रमांक, शेकोटी कार्यक्रमांमध्ये द्वितीय क्रमांक असे एकूण चार पुरस्कार प्राप्त झाले. विद्यार्थ्यांच्या या चमकदार कामगिरीबद्दल त्यांचे शाळेच्या मुख्याध्यापिका सायर मॅडम व अन्य शिक्षक व शिक्षिकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे न्यू इंग्लिश हायर सेकंडरी शाळेची मान अभिमानाने उंचावली आहे, अशी प्रतिक्रिया मुख्याध्यापिका सायर यांनी व्यक्त केली आहे.

# देश पातळीवरील कुस्ती स्पर्धेत साहिल दाते विजेता

## 55 किलो वजन गटात मिळविले सुवर्णपदक

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी, ( दि.16 )**- अंजनगाव सुर्जी तालुक्यातील हंतोडा या गावच्या सुखदेवराव अभ्यंकर विद्यालयाचा विद्यार्थी साहिल सुरेश दाते याने एकल राष्ट्रीय खेल अभियानाअंतर्गत भुवनेश्वर येथे पार पडलेल्या कुस्ती स्पर्धेत विजेतेपद प्राप्त केले. ओरिसातील अभ्यत्व युथ क्लबने या खेल अभियानाचे आयोजन केले होते. त्यात 55 किलो वजन गटातील कुस्ती स्पर्धा जिंकून साहिल दाते याने सुवर्णपदक प्राप्त केले.



सुवर्णपदकासह चषक व दहा हजार रुपये रोख पुरस्कार देऊन साहिल दाते याला सन्मानित करण्यात आले. या यशानंतर साहिल दाते हा खेलो इंडिया मध्ये सुद्धा सहभागी होणार आहे. या यशाबद्दल साहिलचे राहुल व्यायाम प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष मधुकर अभ्यंकर, संस्थेचे अध्यक्ष क्षितिज अभ्यंकर, सचिव गजानन वानखडे, संचालिका शुभांगी अभ्यंकर, तसेच सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक केतन खीरकर, क्रीडाशिक्षक विपिन हंतोडकर आदींनी अभिनंदन केले आहे.

### रेवसा येथे घर फोडले

**अमरावती** - वलगाव ठाण्याच्या हद्दीतील रेवसा येथील रहिवासी एका नागरिकाचे घर फोडून 22 हजार 500 रुपयांचा मुद्देमाल लांबविण्यात आला. ही घटना 15 फेब्रुवारी रोजी उघडकीस आली. रेवसा येथील रहिवासी गजानन हिंमतराव कराडे (55) यांचे घर फोडून अज्ञात चोरट्याने 22 हजार रुपये रोख व अन्य साहित्य असा 22 हजार 500 रुपयांचा मुद्देमाल लांबविला.

# निर्मिती बंड हिची महसूल सहाय्यक पदी निवड

■ हिवरखेडच्या शिरपेचात मानाचा तुरा
■ लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत मिळविले यश

**महासागर प्रतिनिधी**
**हिवरखेड ( दि.16 )**- हिवरखेड येथील रहिवासी सुनील ज. बंड यांची कन्या कु. निर्मिती सुनील बंड हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या परीक्षेत नेत्रदीपक यश संपादन केले असून तिची महसूल सहाय्यक पदी निवड झाली आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून कठोर परिश्रम आणि जिद्दीच्या बळावर कु. निर्मितीने लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण केली आणि हिवरखेडच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

निर्मितीचे वडील सुनील बंड हे शेतकरी असून आई गृहिणी आहे. घरची आर्थिक परिस्थिती तशी साधारण. आजूबाजूला स्पर्धा परीक्षेचे वातावरण नसताना निर्मितीने चिकाटीने परीक्षेची



तयारी केली व हे यश संपादन केले. दोन वर्ष तिने त्यासाठी सातत्यपूर्ण परिश्रम घेतले. निर्मितीचे हे यश हिवरखेड वासियांसाठी अभिमानास्पद ठरले आहे.

तिने गावातील अन्य मुला-मुलींसमोर प्रेरणा निर्माण केल्याची प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केली. निर्मिती ही संस्कार प्राथमिक इंग्रजी शाळेची माजी विद्यार्थिनी आहे. तिने आपल्या यशाची श्रेय शिक्षक, आई-वडील व नातेवाईकांना दिले आहे.

# देवरणकर नगरात साईबाबा समाधी मंदिराचा देखावा

## गजानन महाराज प्रगट दिन महोत्सवाला सुरुवात ● पादुका दर्शनासह अनेक कार्यक्रम

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.16 )** - श्री संत गजानन महाराज बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने बडनेरा मार्गावरील देवरणकर नगर येथे श्री संत गजानन महाराजांचा प्रगट दिन महोत्सव 13 ते 21 फेब्रुवारी या कालावधीत उत्साहात साजरा करण्यात येत आहे. या महोत्सवानिमित्त कार्यक्रमस्थळी संस्थेच्या वतीने शिर्डी येथील साईबाबा समाधी मंदिराचा आकर्षक देखावा उभा केला असून त्याच्या दर्शनासाठी भाविकांची दररोज मोठी गर्दी होत आहे.

13 फेब्रुवारी रोजी मान्यवरांच्या व संतांच्या उपस्थितीत साईबाबा समाधी मंदिर देखाव्याचे व या उत्सवाचे उद्घाटन झाले. 21 फेब्रुवारी पर्यंत अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज काकड आरती, धुपारती, माध्यान्ह आरती, विष्णू सहस्त्रनाम पठण, अभिषेक पूजा केली जात आहे. आज रविवारी या उत्सवात श्री संत गजानन महाराज आणि श्री साईबाबा यांच्या मूळ पादुकांच्या दर्शनाचा योग जुळून आणण्यात आला होता. शिर्डीच्या निमोन गावातील नानासाहेब निमोणकर यांच्या घरी असलेल्या 125 वर्षापूर्वीच्या साईबाबांच्या पादुका तसेच दिनेश कुमार देशमुख यांच्या घरी असलेल्या श्री संत गजानन महाराजांच्या मूळ चरण पादुका कार्यक्रम स्थळी भाविकांच्या दर्शनासाठी आणण्यात आल्या होत्या. यावेळी पादुका दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. या महोत्सवात 21 फेब्रुवारी रोजी शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. महेंद्रसिंग यादव व संचाचा भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. 20 फेब्रुवारीला श्री गजानन महाराजांचा 137 वा प्रगट दिन महोत्सव साजरा करण्यात येणार असून संपूर्ण परिसरात दीप प्रज्वलित करून श्रींची महाआरती करण्यात येणार आहे. हभप श्रीहरी महाराज सोनेकर यांचे गोपालकाल्याचे कीर्तन आणि महाप्रसादाने या महोत्सवाची सांगता होणार आहे. या प्रकट दिन महोत्सवाचे अध्यक्ष प्रसिद्ध उद्योजक चंद्रकुमार जाजोदिया हे आहेत. तर कार्याध्यक्ष म्हणून



चंद्रकांत कलोती व स्वागताध्यक्ष म्हणून नानकराम नेभनानी जबाबदारी सांभाळत आहेत. महोत्सवाला मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.



*अमरावती- येथील बापू कॉलनी स्थित गजानन महाराज मंदिरात आज ( दि.16 फेब्रुवारी ) रोजी विजय ग्रंथाचे सामूहिक पारायण करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने भाविक पारायणात सहभागी झाले होते. वाचक रेणुका देशमुख यांनी हे पठण केले. प्रगट दिन महोत्सवाला 14 फरवरी पासून सुरुवात झाली. विविध कार्यक्रमाचे आयोजन करून 20 तारखेला प्रकट दिनानिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.*

# पीआर पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाची गरुड झेप

## 27 विद्यार्थ्यांची 'एपिटोम कॉम्पोनन्ट्स' मध्ये निवड

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.16 )** - पीआर पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयाच्या कोअर विभागात अंतिम वर्षाला शिकत असलेल्या 27 विद्यार्थ्यांची 'एपिटोम कॉम्पोनंट्स' या प्रतिष्ठित कंपनीत निवड झाली आहे. महाविद्यालयातील कॅम्पस प्लेसमेंटद्वारे या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

एपिटोम कॉम्पोनंट्स ही नामांकित कंपनी ऑटोमोबाईल आणि इलेक्ट्रॉनिक क्षेत्रातील प्रगत तंत्रज्ञानासाठी प्रसिद्ध आहे. या विद्यार्थ्यांना कंपनीच्या



विविध महत्त्वपूर्ण विभागांमध्ये काम करण्याची संधी मिळाली आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये महाविद्यालयाच्या इलेक्ट्रॉनिक्स अँड डेली कम्युनिकेशन, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विभागातील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. यज्ञेश बुंदेले, सोहम होले, सोनाली चव्हाण, ऐश्वर्या बांते, अमृता पुंडकर, मेघांकर ठमके, दीप गहूकार, प्रणांगणी मांजरे, ऋतिका पांडे, आयुष्य वर्मा, वृषाली जाधव, तेजस्विनी डोंगरे, श्रेयश क्षीरसागर, चैताली भोईर, वेदांत दिवाण, ऋतिका कडू, मानसी गुल्हाने, सेजल बोराटे, समीक्षा हेंबाडे, ऋषिकेश खराड, जानवी भुटे, श्रावणी रुंदलकर, सई कावलकर, अभिषेक जयस्वाल, साक्षी राठोड, सुमित वाडीकर आणि वेदिका पिंजरकर या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

महाविद्यालयाचे मार्गदर्शन, प्रकल्प आधारित शिक्षण आणि उत्कृष्ट तांत्रिक प्रशिक्षणामुळे आपण हे यश प्राप्त करू शकलो, अशी प्रतिक्रिया या विद्यार्थ्यांनी व्यक्त केली आहे. सर्व विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे संचालक डॉ. पी. एम. खोडके, प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया, कार्पोरेट रिलेशन डीन प्रा. मोनिका जैन, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. प्रतीक भट्टड, विभाग प्रमुख डॉ. सोमदत्त तोंडरे, डॉ. उमेश होरे, डॉ. अपर्णा तेलंग, प्रा. मनिष वालेचा, प्रा. अनिकेत पावडे, प्रा. सचिन जळीत यांनी अभिनंदन केले आहे.

# अवैध व्यवसाय, जुगार अड्डयांना नवी उभारी

## गुन्हे शाखा आणि डीबी पथके ठरताहेत 'पांढरा हत्ती'

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.16 )**- ग्रामीणमध्ये अवैध व्यवसाय वाढल्यानंतर पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांना धारेवर धरले जाते. मात्र गुन्हे शाखाही याकरिता जबाबदार असताना गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना सॉफ्ट कॉर्नर दिल्या जात आहे. त्यामूळेच जिल्ह्यातील ग्रामीण भागात गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. त्याचबरोबर अवैध व्यवसायांनादेखील नवी उभारी मिळालेली आहे.




ग्रामीण भागातील एखाद्या मोठ्या गुन्ह्याचा छडा लावणे, यासोबतच अवैध व्यवसायांनादेखील चाप लावण्याची जबाबदारी असलेली गुन्हे शाखा सध्या सर्व काही करूनही नामानिराळी राहत आहे. ग्रामीण भागात अवैध व्यवसाय आढळल्यास संबधित पोलीस ठाण्याच्या ठाणेदाराला कैचीत पकडल्या जाते. मात्र मलिद्यात सहभागी असलेली गुन्हे शाखेची पथके वरिष्ठांच्या कैचीत सापडत नाही हे विशेष. मात्र यामुळे अधिकारी कर्मचाऱ्यांना आपल्यासोबत होत असलेली सावत्रपणाची जाणीव स्पष्ट होत आहे. कारवाईचा फास फक्त आमच्यावरच का? असा प्रश्न बोलवून दाखविला जात आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागात अवैध धंद्याचे सध्या 'पेव'च फुटले आहेत.

मसाज पार्लर, मटका, क्लब या तीन धंद्यांचे मोठे जाळे निर्माण झाले आहे. कत्तलीकरिता गोवंश तस्करी देखील मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. त्यावरील कारवाईमध्येही मिलीभगत असते. त्यातही कारवाईत तुरळक ग्राहक आढळले अन् साहित्यही पाच-दहा हजारांचे दाखवून ही कारवाई पुर्णत्वास नेली जाते. अशा कारवाया गुन्हे शाखेकडून अधून-मधून पडणाऱ्या सुर्य 'किरण' सारख्या होत असतात.

### पोलीस दलात खमक्या अधिकारीच नाही ?

गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाने अवैध व्यावसायांवर कारवाई करत गेल्या काही वर्षात एक वेगळे अस्तित्व निर्माण केले होते. परंतु, पुन्हा हे वेगळेपण लालफितशाहीत जमा झाल्याचे दिसत आहे. तर ह्या शाखेलाच कुलूप लावण्याचे प्रयत्न वरिष्ठांकडून सुरू होते. पण, ती बंद करता येत नसल्याने मनुष्यबळात घटक करून तिला निकामी केले आहे. अतिरिक्त पदाधिकाऱ्यांवर जबाबदारी देत दोन चार कर्मचाऱ्यांची नेमणूक तेथे ठेवली आहे. अवैध धंद्यांत सर्वाधिक 'मलिदा'हाच विभाग खातो असे सुत्रांकडून सांगितले जात आहे. प्रमुख पदी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांची बाबुगिरी सुरु असल्याने जिल्ह्यात 'तेरीभी चूप मेरी भी चूप' करत सर्वकाही सुरु आहे.

## जाहिरनामा/सायटेशन

**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती**
**विद्यमान श्रीमती जे.के. चैनानी, १० वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज -६१/२०२५
श्रीमती देविका कांतीलाल भट व ईतर- वि.- निरंक
पुढिल तारीख २५.०३.२०२५

**अर्जदार :-** १. श्रीमती देविका कांतीतात भट, वय ६६ वर्ष, व्यवसाय- घरकाम, रा. कृष्णार्पण कॉलनी, दसरा मैदानाच्या मागे, अमरावती, तालुका जिल्हा अमरावती., २. स्वाती भावेश त्रिवेदी (लग्नाअगोदरचे नांव स्वाती कांतीलाल भट) वय- ४४ वर्ष, व्यवसाय- घरकाम, रा. सि-विंग, ३०४, श्रीजी ब्रज भूमी, जी.बी. रोड, चितलवार, मानपाडा ठाणे वेस्ट, ठाणे, महाराष्ट्र ४००६०७., ३. प्रियंका हेमांग दवे (अग्नाअगोदरचे नांव प्रियंका कांतीलाल भट) वय- ३९ वर्ष, व्यवसायस- घरकाम, रा. २१, भलकेश्वर सोसायटी, मद्रासी मंदिराजवळ सोकरा, मनि नगर, अहेमदाबाद सिटी, अहेमदाबाद गुजरात ३८०००८.

**विरूद्ध**

**गैरअर्जदार - निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत कांतीलाल नारायण भट हे अर्जदार क्र.१ चे पती आहे तर अर्जदार क्र. २ व ३ या विवाहित मुली आहे. त्यांचे दिनांक १५-०८-२०२४ रोजी बखतार हॉस्पीटल, अमरावती येथे मयत झालेत. मयत शांताबाई नारायण भट या मयत कांतीलाल नारायण भट यांची आई आहे. अर्जदार श्रीमती देविका कांतीलाल भट अधिक दोन यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत Application for grant of legal Heir Certificate unde clause 2 of Bombay Regulation Act VIII of 1827 प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा अर्जदार श्रीमती देविका कांतीलाल भट अधिक दोन वरीलप्रमाणे सदर्हू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिद्धीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदर्हू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिल्यास त्यांना सदर्हू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. २९.०१.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती**